लोकमत

# 'हवामान बदल' दंतकथा नव्हे, हे धोकादायक सत्य आहे

## प्रा. बी. एन. गोस्वामी : नीरीचा ६६ वा स्थापना दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** गेल्या २०० वर्षांत मानवी क्रियाकलापांमुळे नैसर्गिक समतोल लक्षणीयरीत्या बिघडला. ऊन, पावसाच्या ऋतूत दिसणारे बदल, वारंवार घडणाऱ्या महापुराच्या घटना, तापमान वाढ हे हवामान बदलाचाच परिणाम आहे. त्यामुळे २० वर्षांपूर्वी हवामान बदल मिथक वाटत असले तरी ते अभ्यासातून सत्य बाहेर आले आहे व त्याचे परिणाम धोकादायक असतील, अशी भीती गुवाहाटीच्या कॉटन विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. बी. एन. गोस्वामी यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (नीरी) चा स्थापना दिवस सोमवारी उत्साहात साजरा करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी संरक्षण मंत्रालयाच्या डीआरडीओ संस्थेचे वैज्ञानिक डॉ. उपेंद्र कुमार सिंह, नीरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य प्रामुख्याने उपस्थित होते.

'हवामान बदल व शाश्वत विकास' विषयावर बोलताना प्रा. गोस्वामी यांनी सांगितले, प्रसिद्ध वैज्ञानिक मायकल वान यांनी २००० वर्षांतील जागतिक तापमान ट्रेंड त्यांच्या 'हॉकी स्टिक' या आलेखात मांडले असून त्यात तापमान वाढ व हवामान बदलाचे सत्य पुढे आणले. वातावरणातील कार्बन डायऑक्साइडची सध्याची पातळी ४२३ पीपीएम आणि मिथेन १९२१ पीपीबी एवढी वाढली आहे. आपण हवामान बदलाच्या धोकादायक टप्प्यावर पोहोचलो असल्याने पर्यावरण वाचवण्याची गरज आहे. जागतिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण प्रथम स्थानिक समस्या सोडवणे आवश्यक आहे. पर्यावरण आणि हवामान एकमेकांशी जोडलेले आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे ही सर्वांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. समुद्रातून कार्बन काढणे हा वातावरणातून काढण्यापेक्षा चांगला पर्याय आहे, असेही त्यांनी सूचविले.



**नीरीच्या कार्यक्रमात बोलताना बी. एन. गोस्वामी.**

डॉ. उपेंद्र कुमार सिंह यांनी भारताकडे २०४७ पर्यंत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याची क्षमता आहे, असा विश्वास व्यक्त केला. स्थापना दिनाचे औचित्य साधून इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक प्रयोग बनविण्याची स्पर्धा घेण्यात आली, ज्यातील विजेत्यांना सोमवारी पुरस्कृत करण्यात आले. यासह नीरीच्या उत्कृष्ट काम करणाऱ्या वैज्ञानिक व अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रधान वैज्ञानिक डॉ. लाल सिंह यांना सर्वोत्तम वरिष्ठ वैज्ञानिक व डॉ. देबिश्री खान यांना सर्वोत्तम ज्युनिअर वैज्ञानिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. जी. हिप्परगी यांना सर्वोत्तम तांत्रिक अधिकारी तसेच पी. भट्टाचार्य व माधुरी उरकूडकर यांना सर्वोत्तम तंत्रज्ञ पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले. अतिक उद्दीन, प्रिया पाटील, पी. जी. केळापुरे व स्वप्नील मेश्राम यांना गौरविण्यात आले. प्रधान वैज्ञानिक डॉ. कविता गांधी यांनी सूत्रसंचालन केले, तर वरिष्ठ प्रधान वैज्ञानिक प्रकाश कुंभारे यांनी आभार मानले.